# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 16-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करू नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

कोंकणात विखुरलेल्या वस्त्यांचे प्राबल्य आहे. कोंकणात खलाटी भागातील खेडी या उत्तर-दक्षिण रेखाकृती दिसतात. गावातील प्रमुख रस्त्याच्या दुतर्फा घरे असतात. एका गावाची सीमा दुसऱ्या गावाच्या वस्तीला मिळालेली असते. एकाच नात्याच्या किंवा एका जातीच्या दोन-चार वस्त्याही असतात. त्यांना पाडा, पडाळ इत्यादी नावाने ओळखले जाते. पर्वतराईला लागून असलेल्या वलाटी भागातील खेडी एखाद्या ओळीसारखी दिसतात. सपाट जमीन उपलब्ध नसल्याने घरे बऱ्याच प्रमाणात विखुरलेली दिसतात. काही ठिकाणी ती एकत्र पुंजक्यासारखी देखील आढळतात. पूर्व विदर्भात खेड्यांचा आकार लहान असतो. आदिवासी लोकांच्या दहा-वीस झोपड्या मिळून वाडी अस्तित्वात येते. जास्त पर्जन्य, समृद्ध भूजल-पातळी, सुपीक जमीन असूनही आदिवासींचा विकास झालेला नाही. महाराष्ट्रात पर्वतीय व डोंगराळ भागात आदिवासी जमाती राहतात. तेथे सलग शेतजमीन नसल्याने अशी विखुरलेली खेडी असतात. महाराष्ट्रातील गोंड, कोलाम, कोरकू इत्यादी वन्य जातींचे वास्तव्य असणाऱ्या वनक्षेत्रात पुंजक्या-पुंजक्यांनी घरे बाधल्याचे आढळते. महाराष्ट्रात या शेतवस्त्यांना वस्ती म्हणतात.